## सत्र ५ : घटक २

# ॲरिस्टॉटल

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ जीवन परिचय व ग्रंथलेखन

२.२.२ ॲरिस्टॉटलवरील प्रभाव

२.२.३ ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार

२.२.४ ॲरिस्टॉटलचे क्रांतिसंबंधी विचार

२.२.५ ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार

२.२.६ ॲरिस्टॉटल राज्यशास्त्राचा जनक

२.२.७ ॲरिस्टॉटलचे गुलामगिरी (दासप्रथा) विषयी विचार

२.२.८ ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्याविषयी विचार

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.४ स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासात आपल्याला

- ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार स्पष्ट करता येतील.
- क्रांतिसंबंधी विचार स्पष्ट करता येतील.
- ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचाराचा आढावा घेता येईल.
- ॲरिस्टॉटलचे राज्यशास्त्राचा जनक म्हणून केलेले विवेचन गुलामगिरी (दासप्रथा) विषयी विचार समजून घेता येतील.
- आदर्श राज्याविषयी ॲरिस्टॉटलचे मत जाणून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

ग्रीक नगरराज्यात होऊन न गेलेला आणि राज्यशास्त्र या विषयाला शास्त्रीय रूप देणारा पहिला विचारवंत ॲरिस्टॉटल होय. ॲरिस्टॉटल यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणार आहोत. ॲरिस्टॉटल हा पाश्चिमात्त्य संस्कृतीचा व तत्त्वज्ञानाचा उदगाता मानला जातो. त्याने प्राचीन ग्रीकचे तत्त्वज्ञान शास्त्रशुद्ध पायावर उभारण्याची महत्त्वाची कामगीरी केली आहे. ॲरिस्टॉटल हा तत्त्वज्ञ राजा होऊ गेला. ॲरिस्टॉटल यानी राज्यासंबंधी विचार, राज्याचे वर्गीकरण, नागरिकत्व, क्रांतीसंबंधी विचार मांडून राज्यशास्त्राला एक वेगळीच कलाटणी देण्यात त्याचे महत्त्वाचे योगदान आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ जीवन परिचय व ग्रंथलेखन

ॲरिस्टॉटलचा जन्म इ.स. पूर्व ३८४ मध्ये ग्रीसमधील स्टॅजीरा नावाच्या शहरी झाला. त्याचे वडील निकोमेक्स मॅसिडोनीयाच्या राजदरबारात राजवैद्य होते. राजघराण्याशी वडिलांचा संबंध असल्याने ॲरिस्टॉटलचे जीवन सुखी व संपन्न होते. ॲरिस्टॉटलला विज्ञानात अभिरूची असण्याचे कारण वैज्ञानिक संस्कृती हे असावे. इ. स. पूर्व ३६७ मध्ये ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या ॲकॅडमीत प्रवेश केला. या ॲकॅडमीत ॲरिस्टॉटलने तब्बल २० वर्षे घालविली. त्या काळात प्लेटोची ॲकॅडमी एक नामांकीत विद्यापीठ म्हणून गाजले होते. या ॲकॅडमीत अध्ययनाबरोबरच अध्यापनाचे आणि व्यवस्थापक म्हणून ॲरिस्टॉटला प्लेटोच्या गैरहजेरीत काम करावे लागत असे. प्लेटो म्हणायचा की ॲरिस्टॉटल हा माझा आवडता शिष्य आहे. आपल्या शिष्याविषयी योग्यता प्लेटोला माहिती होती. प्लेटो म्हणतो ॲरिस्टॉटल म्हणजे विद्यापीठाचे मन असे तो नेहमी म्हणे तर ॲरिस्टॉटल ही आपल्या गुरूविषयी आदर, प्रेम, निष्ठा राखत होता. गुरू-शिष्याचे संबंध अधिक निकटचे व दृढ होते. प्लेटोच्या विचारांची त्यांच्या जीवनावरील छाप ही शेवटपर्यंत कायम होती. प्लेटोच्या मृत्यूनंतर त्याला ॲकॅडमी सोडावी लागली. बारा वर्षे तो भ्रंमती करीत राहिला. जगदजेत्या सिंकदराचा गुरू होण्याची त्याला सुसंधी मिळाळी परंतु त्यांची सिकंदरावर कोणत्याच प्रकारची छाप पडली नाही.

इ. स. पूर्व ३३४ मध्ये ॲरिस्टॉटलने अथेन्स येथे एक पाठशाळा सुरू केली. ती पुढे 'लायसिअस' या नावाने प्रसिद्ध झाली. प्लेटोच्या ॲकॅडमीचा अभ्यास करून या धर्तीवरच ॲरिस्टॉटलने ही शिक्षण संस्था स्थापन केली होती. सिंकदरच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. म्हणून त्यानी अथेन्स सोडले. ॲरिस्टॉटलचे ज्ञान एखादया ज्ञानकोषासारखे होते. त्याने अध्यात्म, नितीशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, शरीर विज्ञान, भौतिकशास्त्र, हवामानशास्त्र, खगोल शास्त्र, इत्यादी विषयावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. अशा या महान थोर ग्रीकवेत्याचा मृत्यू इ. स. पूर्व ३२२ मध्ये झाला.

**ग्रंथलेखन**

ॲरिस्टॉटलची प्रतिमा फार दांडगी होती. त्याने जवळ -जवळ सर्वच विषयावर लिखाण केलेले दिसून येते. असा एकही विषय नाही त्याविषयी ॲरिस्टॉटलने लिखाण केलेले नाही. सर्वच विषयावर त्यांचे लिखाण उच्च दर्जाचे होते. ॲरिस्टॉटलने जवळ-जवळ चारशे ग्रंथ लिहिले आहेत. राज्यशास्त्राच्या दृष्टीने त्यांचे महत्वाचे ग्रंथ म्हणजे The Politics आणि The Constitution हे

आहेत. ॲरिस्टॉटलचा The Politics हा ग्रंथ जगप्रसिद्ध मानला जातो. हा ग्रंथ एकूण आठ विभागात विभागला आहे. या ग्रंथामध्ये राज्यव्यवस्थेचे स्वरूप विस्तृतपणाने वर्णन करण्यात आलेले आहे. या ग्रंथात वास्तविकता आढळते. त्याने १५८ राज्याच्या राज्यघटनांचा अभ्यास करून आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे या ग्रंथात तर्कशुद्धता दिसून येते. राज्यशास्त्र नितीशास्त्रापासून कशा प्रकारे भिन्न आहे या विषयी त्यामध्ये लिखाण करण्यात आले आहे. परंतु या ग्रंथामध्ये क्रमबद्धततेचा अभाव आढळून येतो. अनेक गोष्टी, घटनेवर पुन्हा-पुन्हा लिहिण्यात आल्या आहेत. या ग्रंथातील सुव्यवस्थीतपणा यांचा पण अभाव आढळून येतो. तर काही ठिकाणी विषय परिवर्तन झाले आहे. हा ग्रंथ अपूर्ण आणि अस्पष्ट असूनही जगभर प्रसिद्ध ठरला आहे.

ॲरिस्टॉटलचा राज्यशास्त्राच्या दृष्टीने दुसरा महत्वाचा ग्रंथ म्हणजे The Constitution of Athens (अथेन्सची राज्यघटना) होय. हा ग्रंथ लिहिण्याअगोदर ॲरिस्टॉटलने १५८ देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला आहे. या १५८ देशांच्या राज्यघटनेचा तुलनात्मक अभ्यास करून हा ग्रंथ लिहिला आहे. परंतु काळाच्या ओघात हा ग्रंथ नष्ठ झाला आहे. या ग्रंथाचा काही भाग उपलब्ध आहे. या ग्रंथातून ॲरिस्टॉटलचे वास्तवादी रूप आपणाला दिसून येते. ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथ लिखाणाच्या माध्यमातून जगात आपला प्रभाव निर्माण केलेला दिसून येतो.

## २.२.२ ॲरिस्टॉटलवरील प्रभाव

कोणताही विचारवंत जेव्हा आपल्या मेहनतीने मोठा होतो तेव्हा त्यांच्यावर कोणत्या ना कोणत्या घटकाचा विचारांचा, परिस्थितीचा प्रभाव पडतो. अशाच प्रकारे ॲरिस्टॉटलवर ही प्रभाव पडलेला दिसून येतो. ॲरिस्टॉटलवर पहिल्यांदा त्यांच्या गुरूचा प्रभाव पडलेला दिसून येतो. ॲरिस्टॉटल प्लेटोच्या सहवासात कमीत कमी २० वर्षे होता. प्लेटोच्या विचारांचा प्रभाव मोठया प्रमाणात दिसून येतो. प्लेटोचा त्याच्या विचारावरील अशा स्वरूपाचा प्रभाव आहे. आदर्श नागरिक घडण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. मनुष्य सामाजिक जीवनाकडे वळला पाहिजे कमी लोकसंख्या असलेले राज्य हे आदर्श राज्य निर्माण होते. या प्रकारे प्लेटोचा प्रभाव ॲरिस्टॉटलवर आढळून येतो. ॲरिस्टॉटलवर प्लेटोव्यतिरिक्त त्यांच्या वडीलांचा प्रभाव दिसून येतो. ॲथेन्सच्या राजकीय परिस्थितीचा प्रभाव आढळून येतो. ग्रीसमधील नगरराज्यांचाही प्रभाव आढळून येतो. ग्रीक संस्थानाचा प्रभाव आहे. अलेक्झांडरच्या सहवासाचा प्रभाव ॲरिस्टॉटलवर दिसून येतो.

## २.२.३ ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार

ॲरिस्टॉटलने दि. पॉलिटिक्स ग्रंथातील पहिल्याच भागात राज्यासंबंधी विचार मांडले आहेत. राज्याची उत्पती, विकास, उद्‌देश, आणि स्वरूपासंबंधी विस्तृतपणाने विवेचन केले आहे.

### १) राज्याची निर्मिती

राज्याची निर्मिती ही मनुष्याच्या स्वभाविक गरजेतून निर्माण झाली आहे. मनुष्याच्या गरजा ह्या अनंत असतात. त्या सर्व गरजा एकटा माणूस पूर्ण करू शकत नाही. त्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर माणसांची मदत घ्यावी लागते. जसजशा माणसांचया गरजा वाढत गेल्या तसतसे मानंवाचे परस्पर सहाकार्य वाढत गेले. स्त्री-पुरूष एकत्रीकरणातून कुटूंब निर्माण झाले. अशा प्रकारचे कुटूंब जेव्हा परस्परांच्या सहकार्याने वागू लागले तेव्हां गाव निर्माण झाले. गावाचा हळूहळू विस्तार होऊन शहर

निर्माण झाले त्यातून नगरराज्य निर्माण झाले. मानवीविकास वाढत गेला आणि मानव आपल्या अंतिम ध्येयापर्यंत येऊन पोहचला. मानवाच्या भौतिक गरजांच्या पूर्ततेसाठी गाव असमर्थ ठरले. समाजांच्या नियमांची, नियंत्रणाची, संरक्षणाची गरज भासू लागली. यातूनच राज्यसंस्थेची निर्मिती झाली.

**२) राज्य ही नैसर्गिक संस्था**

मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्याच्या उपक्रमातून निर्माण झालेले राज्य मनुष्याला सुखी, आनंदी, सन्मानीत, चांगले जीवन जगण्यासाठी सदैव अस्तित्वात राहणारी संस्था आहे तात्पर्य अशा आहे की चांगले जीवन जगण्यासाठी राज्याची आवश्यकता असते. राज्याशिवाय मनुष्य मनुष्यासारखे जीवन जगू शकते अशी ॲरिस्टॉटलचे मत आहे. मनुष्य हा बुद्धिवादी प्राणी आहे त्याच्या अंगी विचार करण्याची शक्ती आहे. ही शक्ती त्याला सामजिक आणि राजकीय जीवनातच प्राप्त होते.

**३) राज्य सेंद्रिय आहे**

ॲरिस्टॉटलने राज्याला सेंद्रिय म्हटले आहे. मनुष्यात ज्या प्रकारचे गुण असतात त्या प्रकारचे गुण देखील राज्यात असतात. मनुष्याच्या शरीरात जसे निरनिराळे अवयव असतात तसेच राज्यातही निरनिराळे अवयव असतात. त्या सर्व अवयवाचे एकजीव रूप म्हणजे राज्य होय. राज्याचे सैन्य, कायदेविभाग, कार्यकारी विभाग, न्यायविभाग शेतकरी, नागरीक व्यक्ती समुदाय, गाव, शासक वर्ग हे राज्याचे वेगवेगळे अवयव आहेत. या सर्व अवयवांचा राज्याशी अविभाज्य संबंध असतो. ॲरिस्टॉटलने राज्य आणि मानवी शरीरात साम्य दर्शवून म्हटले आहे. राज्य मानवी शरीराप्रमाणे आहे.

**४) राज्य हे सर्वश्रेष्ठ समुदाय**

राज्याच्या सत्तेला ॲरिस्टॉटलने सार्वभौम शब्द वापरला नाही. राज्याची सत्ता सर्वश्रेष्ठ असते एवढेच त्यांनी म्हटले आहे. मनुष्याने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी विशिष्ठ प्रकारचे समुदाय निर्माण केले आहेत. समुदायांचे पहिले उद्दिष्ठ आहे की, जणतेचे कल्याण करणे ॲरिस्टॉटल राज्याला समुदाय मानतो. कारण इतर समुदांयाचे अस्तित्व राजयातच असते. राज्याशिवाय इतर समुदाय आपला उद्देश पूर्ण करू शकत नाही.

**५) राज्य विभीन्नतेत एकतेचे प्रतीक आहे**

जशा प्रकारे सत्तसुरांतून एका चांगल्या संगीताची निर्मिती होते. तसेच राज्याच्या विभीन्न अंगाच्या माध्यमातून एकात्मतेची निर्मिती होते. राज्यात विभीन्नता असणे आवश्यक आहे. भिन्नता नष्ठ करणे म्हणजे अत्यंत निकृष्ठ प्रतीचे राज्य निर्माण करणे हे होय. ॲरिस्टॉटलने राज्याला एकतेवर जास्त भर दिलेला आहे. काही बाबतीत नियत्रंण आणि इतर गोष्टीचे नागरीकांना स्वांतत्र्य दिले तर राज्यात एकता निर्माण होण्यास मदत होते.

**६) स्वावलंबन**

ॲरिस्टॉटलच्या काळात नगरराज्य स्वावलंबी होते. राज्य अशी संस्था आहे की, ज्यात नागरिकांच्या इतर भौतिक सोई सुविधा पुरवल्याच पाहिजेत मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर काही संख्या कमी पडू लागल्यामुळेच राज्याची निर्मिती झाली. राज्याचे कर्तव्य आहे की मनुष्याचा सर्वच गरजाची पूर्तता करणे कारण राज्य ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे.

## ७) राज्याचा विकास

राज्याच्या विकासांच्या बाबतीत ॲरिस्टॉटलने तीन अवस्थाचे वर्णन केले आहे. एक रानटी अवस्था, दुसरी पशुपालन आणि शेवटची बौद्धिक अवस्था होय. या पहिल्या अवस्थेत मानव केवळ प्रजोत्पादन करून वंशावळ कायम ठेवणे हा रानटी अवस्थेचा गुणधर्म आहे. राज्याच्या विकासातील पहिली पायरी म्हणजे कुटूंबसंस्था होय. या आवस्थेत मानसाची कुटूंबे निर्माण केली. अनेक कुंटूंबातून ग्राम निर्माण झाले. राज्याच्या विकासाची दुसरी अवस्था म्हणजे पशूपालन अवस्था होय. गावचे जीवन सुखी समाधानी राहावे यासाठी नियमाची निर्मिती करण्यात आली. वेगवेगळ्या नियमांची निर्मिती या दुसऱ्या अवस्थेत करण्यात आले. राज्याच्या विकासाची तिसरी अवस्था म्हणजे बौद्धिक आवस्था होय. राज्य हे मनुष्याच्या बौद्धीक विकासांचे प्रतीक आहे.

## ८) राज्याची उद्‌दिष्ट्ये (कार्ये)

ॲरिस्टॉटलच्या मते केवळ जगणे हा मनुष्याचा उद्‌देश नसून ते जीवन श्रेष्ठ प्रतीचे जीवन जगणै हे त्यांचा उद्‌देश आहे. हा मानवाचा उद्‌देश प्राप्त करून देणे हे राज्याचा उद्‌देश आहे. राज्य हे मानवी जीवनासाठी निर्माण झाले आणि चांगल्या जीवनाच्या पूर्ततेसाठी टिकून राहिले. मानवाला सद्‌गुणी बनविण्यासाठी राज्यांनी त्यांच्या नैतिक गुणांचा विकास करावा. राज्यांच्या कार्यातून मनुष्याला उच्च मूल्यांची प्राप्ती झाली पाहिजे. राज्याचे कार्य हे सकारात्मक आणि रचनात्मक दोन्ही स्वरूपाचे आहेत. मनुष्याला नैतिक बनवण्याची जबाबदारी राज्यांची आहे. राज्यांने मनुष्याला धर्मसुसंगत बनवावे. एखाद्याने दुसऱ्याच्या अधिकारात हस्तक्षेप रोखण्यापुरते राज्याने कार्ये करू नये तर त्या मनुष्याच्या अंगी अपराधीपणाची वृत्ती बळावणार नाही, नष्ट होईल असे राज्यानी कार्ये करावे. ॲरिस्टॉटल म्हणतो मनुष्य म्हणजे गुण आणि दोषांचा समन्वय आहे. राज्याने मनुष्याच्या दोंषावर अंकूश ठेवावा. समाजात न्यायव्यवस्था प्रस्थापित करून मानवाला उच्च प्रतिचे जीवन कसे जगता येईल यासाठी राज्यांनी कार्ये करावे. राज्याला ॲरिस्टॉटलने समुदाय बनविले आहे. समुदायाप्रमाणेच राज्यानी कार्ये करणे ही मनुष्याची भावना आहे असे ॲरिस्टॉटल म्हणतो. राज्यामुळे मानवी जीवन सुसंस्कृत बनते. मानवी जीवन संकुचीत न होता ते विकसीत होते राज्याने नकारात्मक कार्यामध्ये केवळ नागरिकांच्या अधिकारात आक्रमण होऊ नये, आर्थिक गरजांची पूर्तता व्हावी याविषयी समाजात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी न्यायाच्या उद्‌देशाने राज्याची कार्ये करावे. ॲरिस्टॉटल राज्याच्या कार्याबाबत सकारात्मक कार्यावर जास्त भर देतो.

**स्वयं: अध्ययन प्रश्न–१**

**खालील प्रश्नाची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१) ॲरिस्टॉटलच्या जगप्रसिद्ध ग्रंथाचे नाव काय?

२) The Politics हा ग्रंथ किती विभागात विभागला आहे?

३) ॲरिस्टॉटलच्या गुरूचे नाव काय?

४) ॲरिस्टॉटलने किती देशांच्या राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास केला?

५) ॲरिस्टॉटलने राज्याच्या विकासाच्या किती अवस्था सांगितल्या?

**ॲरिस्टॉटलचे राज्याचे वर्गीकरण**

सामान्यपणे आजच्या काळात राज्याचे वर्गीकरण करणे शक्य नाही असा विचार प्रवाह आहे. राज्यांचे वर्गीकरण या विषयी ॲरिस्टॉटलवर प्लेटोच्या स्टेटसमन ग्रंथाचा प्रभाव आढळून येतो. राज्याच्या आवश्यक घटकाचा विचार केल्यास राज्य केवळ लहान आणि मोठे या दोन्हीतच वर्गीकरण करता येतो. ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणाला समजावून घ्यायचे असल्यास तत्कालीन परिस्थितीला समजणे आवश्यक आहे. त्या काळात राज्य आणि शासन यात फरक केला जात नसे. त्यामुळे जी शासनाची कार्ये ती राज्याची कार्ये समजल्या जात असल्यामुळे दोन्ही शब्दाला समानार्थी मानण्यात येत असे. शासनाची सत्ता कोणाच्या हाती आहे. या आधारावर त्यानी राज्याचे वर्गीकरण केले आहे. ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण करण्यापूर्वी संविधानाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

**संविधानाचा अर्थ**

'ॲरिस्टॉटलने पॉलिटिक्स' या ग्रंथात विभिन्न संविधानाचे वर्णन केले आहे. त्यांच्या मते संविधान म्हणजे ''अशा प्रकारची व्यवस्था ज्या द्वारे राज्यातील सार्वभौम सत्तेचे स्थान निश्चित होऊन ते नेमले कुठे आहे याचे ज्ञान होते. शासनाचे स्वरूप कसे आहे. शासनाचा उद्‌देश काय आहे शासनाचे कार्ये आहेत हे ज्याद्वारे समजते ते संविधान होय''. संविधानाने राज्याची निर्मिती होते. त्यामुळे जेव्हा संविधानात बदल झाल्यास राज्यातही बदल होतो. तात्पर्य असे की, संविधानाला मात्र राज्याचे अंग मानत नाही तर संविधानात राष्ट्रीय एकात्मतेची अभिव्यक्ती असते. संविधानातील बदलाबाबत त्याचा अर्थ स्पष्ट करतानाए ॲरिस्टॉटल म्हणतो की शासनाची सार्वभौम सत्ता ज्यांच्या हाती आहे अशा पदव्यवस्थेत परिवर्तन म्हणजे संविधानात बदल नाही तर त्यांचा परिवर्तनाचा अर्थ फार व्यापक आहे. त्याच्या मते समाजातील नैतीक, आर्थिक, सामाजिक मूल्यांमध्ये जेव्हा बदल होतो तेंव्हा संविधानात परिवर्तन झाले असे मानतो. याचाच आधार होऊन संविधानांचे वर्गीकरण करून राज्यांच्या वर्गीकरणाचे प्रतिपादन करतो. राज्याच्या वर्गीकरणाचे निकष ॲरिस्टॉटलने पुढील दोन घटकाच्या अधारे केले आहे.

**वर्गीकरणाचे निकषः**

**१) संख्यात्मक**

संख्या तत्वाचा आधार घेताना ॲरिस्टॉटल म्हणतो की राज्यांतील सार्वभौम सत्तेचा वापर करण्याची संख्या किती आहे. या आधारावर राज्याचे प्रकार पाडले आहेत.

**२) गुणात्मक / उद्‌देशात्मक**

गुणात्मक तत्व म्हणजे राज्याची सार्वभौम सत्ता वापरण्यामागील हेतू काय आहे. तसेच सत्ता वापरणाऱ्याचा हेतू कोणता आहे. सार्वभौम सत्ता वापरणाऱ्याचा हेतू स्वार्थी आहे की निस्वार्थी आहेत, यावरून राज्याचा उद्‌देश सार्वजनिक आहे की वैयक्तीक हित आहे हे यावरून लक्षात येते. तसेच यावरून राज्याचे शुद्ध आणि अशुद्ध प्रकार पाडले आहेत.

**राज्याचे वर्गीकरणः**

**राज्याचे वर्गीकरण**

संख्यात्मक | गुणात्मक

| संख्यात्मक | शुद्ध प्रकार | अशुद्ध किंवा भ्रष्ट प्रकार |
|---|---|---|
| १) एक व्यक्ती | राजेशाही / राजतंत्र | हुकूमशाही |
| २) काही व्यक्ती | महाजनसत्ता / कूलीन तंत्र | अल्पजनशाही / सरंजामशाही / धनिकतंत्र |
| ३) अनेक व्यक्ती | लोकशाही (समतोल) | लोकशाही (झुंडशाही) |

ॲरिस्टॉटलने संख्यात्मक व गुणात्मक तत्वाच्या आधारावर राज्याचे शुद्ध व अशुद्ध असे दोन प्रकार सांगितले आहेत अशा एकूण सहा प्रकारात राज्याचे वर्गीकरण केले आहे.

**अ) शुद्ध प्रकार**

**१) राजेशाही**

ॲरिस्टॉटलने राज्याच्या शुद्ध प्रकारात चांगले राज्य म्हणून राजेशाही यांचा समावेश केला आहे. राज्याचा हा सर्वात चांगला प्रकार आहे. शासनाची सत्ता एका व्यक्तीच्या हातात असताना राजा विवेक बुद्धिने निर्णय घेत असतो. त्यांचा उद्‌देश हा जणकल्याणाचा असतो सार्वजनिक हितासाठी चांगले निर्णय एका व्यक्तीला घेता येतात म्हणून राजेशाही हा शासनाचा प्रकार श्रेष्ठ दर्जाचा आहे.

**२) महाजनशाही**

महाजनशाही हा राज्याचा शुद्ध प्रकार आहे. या प्रकारात राज्याची सार्वभौमसत्ता काही मोजक्या लोकांच्या हातात असते. त्या लोकांचा उद्‌देश हा चांगला असतो या शासन प्रकारातील काही लोकांच्या हातात सत्ता असलेले लोक निस्वार्थी व गुणी वृत्तीचे असतात. अशा व्यक्तींना राज्यव्यस्थेचा अधिकार वंशपरंपरेनुसार प्राप्त होऊ शकतो. महाजनशाहीत सार्वभौम सत्तेचा वापर जनतेच्या कल्याणासाठी केला जातो.

**३) लोकशाही**

हा शासनाचा चांगला प्रकार आहे. सर्वसामान्य लोकांना सार्वभौम सत्तेमध्ये सहभागी करून घेतले जाते. या प्रकारात शासनाची सत्ता लोकांच्या हाती असते ते सर्व सुखी जीवनासाठी शासनाचे संचालन करतात जनकल्याण हा शासनाचा उद्‌देश असतो. जनतेचे जनतेसाठी आणि जनतेद्वारे चालविण्यात आलेल्या राज्याची ही अभिव्यक्ती आहे. त्यामुळे आपणच कायदे करणारे, आपणच कायद्याची अंमलबजावणी करणारे ती योग्य की अयोग्य आपणच तपासणारे त्याच्या यशापयशाची जबाबदारी आपल्यावरच असणारी ही जबाबदार शासनपद्धती आहे.

अशा प्रकारे शुद्ध किंवा चांगल्या राज्याचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे. यात महत्वाचे म्हणजे सत्तेचा उपयोग हा जनहित कल्याणासाठीच केला जातो. ज्या शासन पद्धतीत अशा प्रकारचा उद्देश असतो ती शासनपद्धती चांगली असते.

**ब) अशुद्ध प्रकार**

**१) हुकूमशाही**

हा राज्याचा अशुद्ध प्रकार आहे. शासनाची सार्वभौम सत्ता जेव्हा एका व्यक्तीच्या हातामध्ये असते तेव्हा ती व्यक्ती स्वार्थी वृत्तीची असते. स्वार्थाने तो शासन करतो. तेव्हा त्याला आपण हुकूमशाही असे म्हणतो. समाजहितापेक्षा वैयक्तीक हिताला प्राधान्य शासनकर्त्यामार्फत केले जाते. अशा शासनाच्या प्रकारात जनता सुखी–समाधानी जीवन जगू शकत नाही. जनतेचे सुख हा राज्याचा मुख्य उद्देश गमावल्यामुळे हा राज्याचा अशुद्ध प्रकार आहे.

**२) संरजामशाही किंवा अल्पजनशाही**

महाजनशाहीला विकृत रूप प्राप्त होते तेव्हा सरंजामशाही किंवा अल्पजनशाही निर्माण होते. यामध्ये देखील शासनकर्त्याचा उद्देश स्वार्थ असतो. ज्या ज्या ठिकाणी स्वार्थी लोकांच्या हातात राज्य जाते मग ते संख्येने कितीही असो ते राज्य अशुद्ध प्रकारात मोडते. जनतेचे हित करणे त्याचे दुय्यम उद्देश असतो. जणकल्याणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे यात सत्तेचा दुरूपयोग होतो. म्हणून सरंजामशाही हा राज्याचा प्रकार अशुद्ध आहे.

**३) लोकशाही (झुंडशाही)**

हा अशुद्ध राज्याचा शेवटचा प्रकार आहे. ज्यावेळी शासनाची सत्ता सर्वच लोकांच्या हाती असते आणि या सर्वांचा उद्देश स्वार्थ सिद्ध करण्याचा असतो. तेव्हा सत्तेचा दुरूपयोग होऊन गोंधळ आणि अशांतता निर्माण होते. यामुळे समाजामध्ये आराजकता निर्माण होते. ज्याला जसे वाटेल तसे वागल्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था मोडकळीस येतो म्हणूनच या प्रकाराला झुंडशाही म्हटले आहे.

**राज्याचे परिवर्तनचक्र / राजकीय परिवर्तनाचे (क्रांतिचे) फिरते चक्र**

ॲरिस्टॉटलने राज्याचे परिवर्तनाचे चक्र स्पष्ट केले आहे. राज्याच्या वर्गीकरणाचे स्पष्टीकरण केल्यानंतर राज्याच्या परिवर्तन कशा प्रकारे होते या विषयी विवेचन करण्यात आले आहे. शुद्ध आणि अशुद्ध यामध्ये राज्याचे प्रकार तेच आहेत नामसदृष्यामुळे दोन्हीमध्ये नेमके काय पाहिजे यामध्ये विचाराबाबत गोंधळ होऊ नये यासाठी ॲरिस्टॉटलने राज्याचे परिवर्तनचक्र स्पष्ट केले आहे. परिवर्तनाचा विचार करताना त्यांनी समांतर तत्वाचा विचार केलेला आहे.

**परिवर्तनाचा अर्थ :**

राज्यातील परिवर्तन म्हणजे राज्यांचे चांगल्या प्रकारातून वाईट प्रकारात जाण्याची क्रिया होय. ही प्रक्रिया नेहमी चालू असते. म्हणून त्यानी त्याला परिवर्तन चक्र असे म्हटले आहे. राजेशाही हा राज्याचा शुद्ध प्रकार आहे. यामध्ये सत्तेचा वापर करणारा राजा हुशार, बुद्धीवान, गुणी असतो परंतु यातील सर्व राज्याचे राजे हे वरील प्रकारचे असतीलच असे नाही. तर राजा जुलमी, अन्यायी, स्वार्थी असेल तर राजेशाही या शुद्ध प्रकाराचे रूपांतर अशुद्ध हुकूमशाही प्रकारात होतो. राजेशाहीला विकृत

स्वरूप प्राप्त होते या शासनाच्या पद्धतीला लोक कंटाळतात. अशा कंटाळलेल्या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी राज्यातील काही लोंक बुद्धिवान, हुशार, कुशाग्र लोक सार्वभौम सत्ता आपल्या हाती घेतात तेव्हा महाजनशाही हा शुद्ध प्रकार तयार होतो. या महाजनशाहीमध्ये सत्तेचा वापर करणारे लोक हे जनकल्याणासाठी वापर करतात तरच शुद्ध प्रकार टिकून राहातो. अन्यथा कालांतराने हे सत्ता वापरणारे लोक म्हणजे महाजनशाहीतील सत्ताधिश अन्यायी व स्वार्थी वागतात. यातून महाजनशाहीचे रूपांतर संरजामशाहीमध्ये होते. संरजामशाहीमध्ये सत्ताधीश वर्ग हा समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष करून स्वहिताकडे कटाक्षाने लक्ष देत असतो. संरजामशाही हा अशुद्ध प्रकार आहे. यामुळे कालांतराने काही लोक या शासनाल्या प्रकाराला कंटाळून जातात. काही कालांतराने मग लोकशाही निर्माण होते. राज्याची सार्वभौम सत्ता अनेक व्यक्तीच्या हातामध्ये असते. या अनेक सत्ताधिश व्यक्ती ह्या समाजांच्या कल्याणसाठी, विकासासाठी कार्य करतात. समाजातील मनुष्याना उच्च दर्जाचे जीवन जगण्यासाठी कार्य करतात. हे कार्य करता-करता यामध्ये काही स्वार्थी निर्माण होते. मग स्वार्थ निर्माण झाला की काही कालांतराने लोकशाहीचे रूपांतर झुंडशाही चा अशुद्ध प्रकारात परिवर्तन होते. कालांतराने राज्यातील जनता लोकशाहीस (झुंडशाहीस) कंटाळते. अशा वेळी राज्यातील एखादी हुशार, तज्ञ, कर्तबगार व्यक्ती पुढे येऊन सत्ता प्राप्त करते तेव्हा राजेशाही निर्माण होते. अशा प्रकारे राज्याचे फिरतेचक्र हे सतत चालू असते.

**ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणाचे परिक्षण / मूल्यमापन**

ॲरिस्टॉटलने संख्यात्मक आणि गुणात्मक या दोन तत्वाच्या आधारे राज्याचे वर्गीकरण जे केले आहे परंतु त्यांच्या वर्गीकरणावर काही दोष आहेत ते पुढील मुद्द्यावरून करण्यात येते.

**१) शासनाचे किंवा राज्याचे वर्गीकरणः**

ॲरिस्टॉटलने केलेले वर्गीकरण राज्याचे नसून राज्यातील सरकारचे आहे. सरकार परिवर्तनीय असते. पण राज्य परिवर्तनीय नसते. ॲरिस्टॉटलने मात्र राज्य आणि शासन यात फरकच केला नाही वास्तविकता हा सरकार हा राज्याचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. सार्वभौमत्व नष्ट झाले तर राज्य नष्ट होते. त्यामुळे ॲरिस्टॉटलने शासनाचे वर्गीकरण करून राज्याचे वर्गीकरण असे म्हटले आहे.

**२) अपूर्ण वर्गीकरणः**

ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्गीकरण हे पूर्ण नाही अशी टीका केली जाते. ॲरिस्टॉटलने या आधुनिक कालखंडातील शासनाचे जे प्रकार आहेत त्यांचा उल्लेख शुद्ध किंवा अशुद्ध या प्रकारात समावेश केला नाही. म्हणून ते वर्गीकरण अपूर्ण वाटते.

**३) संख्या तत्वावर भरः**

ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण करताना संख्येला आधार माणून राज्याचे प्रकार केले. गुणांना त्यानी ज्या प्रमाणात महत्व द्यायला पाहिजे होते त्या प्रमाणात महत्व दिलेले नाही. अशा त्यांचा वर्गीकरणावर आक्षेप घेण्यात आलेला आहे.

### ४) आधुनिक काळासाठी अनुपयुक्त / निरूपयोगी:

ॲरिस्टॉटलने राज्याच्या वर्गीकरणात ज्या प्रकाराचा उल्लेख केला त्यापैकी अनेक प्रकार हे इतिहास जमा झाले आहेत. त्यामुळे आधुनिक काळात त्याचे वर्गीकरण उपयोगी नाही. आधुनिक काळातील शासनाचे प्रकार यामध्ये संसदीय, अध्यक्षीय, संघराज्यात्मक , एकात्म अशा वेगवेगळया शासनाचे प्रकार आहेत यांचा पण उपयोग ॲरिस्टॉटलने वर्गीकरणात करायला पाहिजे होता पण केलेला नाही अशाी एक टीका केली जाते.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या राज्याचे वर्गीकरण निर्दोष नाही. परंतु त्यामुळे त्यांच्या विचारांचे महत्व काय कमी होत नाही. ॲरिस्टॉटलने केलेले राज्याचे वर्गीकरण हे नगरराज्याच्या पार्श्वभूमीवर तपासणे अगत्याचे ठरेल. ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणाचा आधार घेतल्याशिवाय राज्याचे वर्गीकरण पूर्ण होत नाही. ॲरिस्टॉटलने संख्यात्मक व गुणात्मक तत्वाच्या आधारे राज्याची सार्वभौम सत्ता वापरणारी लोक कोणते व त्याना असलेले सरकार कोणते याविषयी उपयुक्त माहिती सार्वभौम सरकारांना व राज्यातील नागरीकांना मिळण्यासाठी उपयुक्त आहे. ॲरिस्टॉटलने दिलेले शाश्वत तथ्य हे आधुनिक शासनाची पारख होण्यास मदत होते. ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्गीकरण हे शास्त्रशुद्ध व उपयुक्त अशा स्वरूपाचे आहे.

**स्वयं: अध्ययन प्रश्न क्रं. २**

**मोकळ्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण ...... तत्वावर केले.

२) महाजनशाही हा राज्याचा ........ प्रकार आहे.

३) ॲरिस्टॉटलने ....... हा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला.

४) राजकीय परिवर्तनाचे क्रांतिचे चक्र ...... यानी मांडले.

५) सार्वभौम सत्ता काही लोकांच्या हातात असते तेंव्हा ....... राज्याचा शुद्ध प्रकार असतो.

## २.२.४ ॲरिस्टॉटलचे क्रांतिसंबधी विचार

ॲरिस्टॉटलने क्रांतिसंबधी विचांर 'पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या भागात विवेचन केले आहे. क्रांती म्हणजे काय? क्रांतीचे स्वरूप, कारणे, उपाय याविषयी वास्तववादी व मानसशास्त्रीय पद्धतीने विवेचन करण्यात आले आहे. शासनात वारंवार होणारे राजकीय परिवर्तन ही ॲरिस्टॉटलच्या काळातील ही नगरराज्याची फार मोठी समस्या होती. त्याचे कारणे शोधून त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी काही उपाय सूचविण्याच्या अनुषंगाने ॲरिस्टॉटलने क्रांतीसंबधी विचार मांडले आहेत. क्रांती हा राज्यसंस्थेला लागलेला रोग आहे. असे ॲरिस्टॉटल म्हणतो. तो रोग नाहीसा करण्यासाठी ॲरिस्टॉटलने उच्च दर्जाची डोस देण्याचा प्रयत्न क्रांतीविषयक विचारातून केलेला आहे.

**क्रांतीचा अर्थ**

ॲरिस्टॉटलच्या मते, क्रांती म्हणजे बदल होय. मग ते राज्यघटनेत असो किंवा सत्ताधारी व्यक्तीत असो. राज्यघटनेत किंवा सत्ताधारी व्यक्तीत बदल होणे म्हणजे क्रांती होय. राज्यघटनेच्या

बदलामुळे राज्याच्या सामजिक, आर्थिक, प्रशासकीय, स्वरूपात बदल होतो. राज्यघटना तीच राहून सत्ताधारी व्यक्तीत बदल होतो त्यास क्रांती म्हणतात. सामान्यतः क्रांती ही बलपूर्वक होण्याच्या बदलाला म्हणतात. ॲरिस्टॉटलला या पेक्षा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. हे यावरून स्पष्ट होते. तो म्हणतो क्रांतीचे स्वरूप नेहमी सारखे नसते. म्हणून त्यांनी क्रांतीचे प्रकार सांगितले.

**क्रांतीचे प्रकारः**

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती होण्यासाठी पाच प्रकार स्पष्ट करण्यात आले आहेत. क्रांतीसाठी राज्यघटनेत पूर्णतः बदल किंवा अंशतः बदल होतो. यावरून क्रांतीचे प्रकार पाहता येतील.

**१) संपूर्ण क्रांती**

जुन्या राजकीय व्यवस्थेचे समुळ उच्चाटन करून नविन राजकीय व्यवस्था निर्माण होते किंवा जुनी राज्यघटना बदलून पुन्हा नवीन राज्यघटना तयार होते त्या बदलाला संपूर्ण क्रांती म्हणतात.

**२) आंशिक क्रांती**

संविधान जसेच्या तसे रहाणे संविधानातील एखाद्या भागात अल्पशा प्रमाणात बदल होणे म्हणजे अंशतः क्रांती होय.

**३) रक्तमय किंवा रक्तहिन क्रांती**

राजकीय व्यवस्थेत बदल करताना जेव्हा रक्तपात होतो किंवा हिसांत्मक मार्गाने सत्तेत बदल करावा लागतो त्या क्रांतीस रक्तरंजीत क्रांती म्हटले जाते. या उलट अंहिसेंच्या मार्गाने राजकीय व्यवस्थेत बदल केला जातो त्याला रक्तहिन क्रांती म्हणता येतो.

**४) व्यक्तीगत क्रांती**

एखाद्या जुलमी राज्यकर्त्यामुळे राज्यात अन्याय, अत्याचार वाढत असेल त्या विरोधात जनमत संघटीत होऊन संबंधीत राजाला पदावरून पाय उतार करणे म्हणजे व्यक्तीगत क्रांती होय.

**५) वैचारिक क्रांती**

समाजास घातक असलेली प्रचलित विचारप्रणाली टाकून देऊन नवीन विचारप्रणाली स्वीकारणे यास वैचारिक क्रांती असे म्हणतात.

**क्रांतीची कारणे**

ॲरिस्टॉटलने क्रांतीची विविध कारणे विशद केलेली आहेत. परिवर्तनाची कारणे शोधली यालाच क्रांतीचे कारणे म्हणता येईल तो म्हणतो क्रांती तीन कारणांनी होते. ॲरिस्टॉटलच्या क्रांतीच्या मीमांसाने त्यांचे ज्ञान किती सखोल आहे हे आपणाला स्पष्ट होते. क्रांतीचा मुख्य उद्देश हा अन्यायाविरूद्ध उठाव करणे हा असतो. क्रांतीचे प्रमुख तीन कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**अ) क्रांतीची सामान्य कारणे**

प्रथम क्रांतीचा विचार मनुष्याच्या मनात निर्माण होतो. नागरीकांवर जर अन्याय निर्माण होत असेल तर त्या अन्यायाविरूद्ध उठाव करण्याचे निर्धार मनुष्याच्या मनामध्ये निर्माण होतो मग माणूस

परिवर्तन घडवून आणतो. क्रांतीची सामान्य कारणे सांगताना मानसशास्त्रीय, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक दृष्टीकोणातून स्पष्ट करण्यात आलेली आहेत. राज्यात क्रांती घडून येण्यासाठी सामान्यतः पुढील घटक कारणीभूत आहेत.

**१) समानतेची आंकांक्षा**

हे क्रांतीचे मानसशास्त्रीय कारण आहे. समतेची आकांक्षा जागृत होणे हे क्रांतीचे प्रमुख अस्त्र आहे. राज्यात जेव्हा सामाजिक न्याय आणि असमानता नाकारल्या जाते तेव्हा क्रांती होते. समानतेची वागणूक न मिळाल्यास असमानता निर्माण होऊन जनतेत अंसतोषाची भावना निर्माण होते यातूनच क्रांती होते.

**२) आर्थिक विषमता**

आर्थिक विषमतेमुळे गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढत जाऊन श्रीमंत व्यक्ती गरीब व्यक्तीकडे तुच्छ नजरेने तर गरीब व्यक्ती श्रीमंत व्यक्तीकडे ईर्षा व सूडाच्या भावनेने पाहतात आपल्यालाही त्यांच्याप्रमाणे जीवन जगता यावे या भावनेतून क्रांती होते समाजामध्ये आर्थिक विषमतेची खोल दरी निर्माण झाल्यास क्रांती होण्याची भीती असते.

**३) दारिद्र्य**

दारिद्र्य हे क्रांतीच्या पाठीमागील सर्वात प्रमुख कारण आहे. लोकसंख्या वाढत जाते आणि उत्पादनाच्या साधनाना मर्यादा पडतात. राज्यात जनतेला उपासमारीची वेळ निर्माण होते. या उपासमारीच्या वेळेतून जनतेत अंसतोष निर्माण होतो. या जनतेच्या अंसतोषातून काही व्यक्ती बंडाचा मार्ग उपसतात यातूनही क्रांती होते.

**४) भिती**

राज्यातील निरनिराळ्या वर्गात परस्पराविषयी अविश्वासाची भावना वाढीस लागून संशयही बळावतो. यातून एका वर्गाला दुसऱ्या वर्गाविषयी भिती निर्माण होते. गुन्हेगारांना आपल्याला शिक्षा होईल अशी भिती वाटते म्हणून तो शासनव्यवस्थाच उलटून टाकण्याचा प्रयत्न करतो. किंवा भविष्यात आपल्यावर अन्याय होईल या भीतीने तो क्रांती करतो.

**५) पक्षपाती वर्तणूक**

प्रत्येक नागरीकाला राज्यकारभारात भाग घेण्याची समान संधी असावी असे वाटते. एकच गट सत्तेत असेल तर बाकीचे गट नाराज होतात. अशा प्रकारे सत्तेसाठी स्पर्धा सुरू होऊन त्यातून क्रांती होण्याची शक्यता असते.

**६) निष्काळजीपणा**

शासनाच्या निष्काळजीपणामुळे कधीकधी अयोग्य व्यक्तीची नियुक्ती महत्वाच्या पदावर होते. अशी व्यक्ती संधी मिळताच विद्रोह करून सत्ता आपल्या हाती घेते.

### ७) अयोग्य मोबदला

मनुष्याला योग्यतेप्रमाणे त्यांच्या कार्याच्या प्रमाणात जर मोबदला मिळाला नाही तर तो क्रांतीसाठी प्रवृत होतो.

### ब) क्रांतीची विशिष्ठ कारणे

ॲरिस्टॉटलने विविध शासनपद्धतीत क्रांतीची विशिष्ठ कारणे स्पष्ट केलेली आहेत.

### १) राजेशाहीतील क्रांती

राजघराण्यातील कौटूंबीक भांग्णे, परस्परात सत्तेसाठी स्पर्धा, परस्पर द्वेष तसेच जेव्हा राजा आपल्या प्रजेशी जुलमी वर्तन करतो, एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीचा अपमान करतो तेव्हा राजाविरूद्ध कटकारस्थान, बंडखोरी, विद्रोह होण्याची शक्यता असते.

### २) महाजनशाहीतील क्रांती

महाजनशाहीत राज्याची सार्वभौम सत्ता काही लोकांच्या हातात असते. ते सत्ता आणि मानसन्मानाला मत्र होतात जेव्हा हे राज्यातील सामान्य जनतेला सहन होणार नाही तेव्हा ते क्रांतीसाठी प्रवृत्त होतात.

### ३) अल्पजनशाहीतील क्रांती

यामध्ये श्रीमंत पण स्वार्थी राज्यकर्ता जनतेवर जुलूम आणि अत्याचार करतो. राज्यकर्त्यांची लोभी महत्वकांक्षा आणि आपापसातील शत्रुत्व तसेच श्रीमंत लोक सत्तेसाठी सतत धडपडत असतात त्यामुळे जनहितांकडे दुर्लक्ष होऊन जनता क्रांती करण्यास प्रवृत्त होते.

### ४) लोकशाहीतील क्रांती

अनेक वेळा वक्तृत्वाची कला अवगत असलेले लोक सत्य असल्याचा आश्रय घेऊन लोकमत आपल्या बाजूने करून घेऊन जनतेच्या भावनेला आव्हान देऊन ते असंतोष पसरवितात आणि त्यातून क्रांती होते. प्रजा व जनता यामध्ये दुरावा निर्माण होऊन क्रांती निर्माण होते.

### ५) हुकूमशाहीतील क्रांती

एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता असल्याने स्वतःच्या स्वार्थासाठी सत्तेचा दुरूपयोग करून जनहिताकडे दुर्लक्ष केले जाते. जनतेस अन्यायी वागणूक देऊन बेजबाबदारपणे वागतात. अशा जुलमी राजवटीविरूद्ध जनता एकत्र येऊन क्रांती करते.

### क्रांती टाळण्याचे उपाय

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती ही राज्यातील जनतेसाठी धोकादायक आहे म्हणून ती टाळली पाहिजे. याचा अर्थ क्रांती होऊच नये असा नाही क्रांतीची कारणे दाखविण्यात ॲरिस्टॉटलची राजकीय परिपक्वता जेवढ्या मोठ्या प्रमाणात दिसून येते तेवढीच ती क्रांती टाळण्याचे उपाय सांगतानाही दिसून येते. वारंवार होणाऱ्या क्रांतीमुळे राज्यातील स्थैर्य नाहिसे होऊन राज्याच्या विकासात अडथळे निर्माण

होतात. म्हणून क्रांतीची परिस्थितीच निर्माण होऊ नये यासाठी काही उपाय ॲरिस्टॉटलने सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे-

**१) कायदा व न्यायाबद्दल आदर**

जनतेच्या मनामध्ये कायद्याबद्दल सार्वजनिक आदर व निष्ठा निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत. जनतेत कायदा पालनाची सवय वाढीस लावावी. कायदे पालन केले तरच आपले हित साध्य आहे. कायद्याचा आदर केला तरच न्याय प्रस्थापित करता येतो म्हणून कायद्याचा भंग करणाऱ्या व्यक्तीस कठोर शिक्षा करावी.

**२) शिक्षण**

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती टाळण्याचा उत्तम उपाय म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे राज्यातील नागरिकाला क्रांतीच्या गुण-दोषाची पारख करता येते. यामुळे लोकांत कर्तव्याची जाणीव निर्माण होते.

**३) सत्तेचे विकेंद्रीकरण**

राज्याची सत्ता ही एकाच वर्गाच्या हाती केंद्रित होऊ नये सत्तेच्या केंद्रीकरणामुळे सत्ताधारी वर्ग भ्रष्ट बनतो. सत्ता ही मानसाला भ्रष्ट करते आणि निरकूंश सत्तेमुळे माणूस पूर्ण भ्रष्ट होतो. म्हणून मानव भ्रष्ट या पासून मुक्त करायचा असेल तर सत्तेचे विकेद्रिंकरण करावे त्यामुळे क्रांती टाळता येईल.

**४) परिदृढ राज्यघटना**

लवचीक राज्यघटना ही राज्याला अस्थिरतेकडे नेत असते. म्हणून राज्याच्या स्थैर्यासाठी व क्रांती टाळण्यासाठी राज्यघटना परिदृढ असली पाहिजे. राज्यघटना परिदृढ असल्यास राज्यघटनेत सहजा-सहजी बदल करावा अशी भावना जनतेच्या मनामध्ये निर्माण होणार नाही म्हणजे ती क्रांती टाळण्यासाठी उत्तम उपाय आहे.

**५) जागरूक शासन**

राज्याचा शासक वर्ग आपल्या कर्तव्याविषयी नेहमी जागरूक असला पाहिजे. आपल्या राज्यातील हालचालीवर शासकाचे बारीक लक्ष असावे लागते. कोणकोणते गट शासकाच्या विरोधात कार्य करतात. गटबाजी कोण करतो, कोणते गट क्रांतीची तयारी करतात शासकाच्या विरूद्ध काही डावपेच आखले जातात का इत्यादी माहिती मिळवून त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजेत त्यासाठी शासक सतत जागरूक असले पाहिजे.

**६) पदाची समान वाटणी**

राज्यातील विविध पदावर व्यक्तीची नेमणूक करताना समान तत्वाच्या आधारे व्यक्तीची पात्रता व योग्यता पहावी. जे अनेक वर्षापासून नोकरीसाठी वंचीत आहेत त्यांचापण विचार केला पाहिजेत. त्यामुळे राज्यातील नागरीक समाधानी राहतील.

**७) राज्यकर्त्याचे आदर्शवर्तन**

राज्याची सत्ता भोगणाऱ्या राज्यकर्त्यानी आपले वर्तन साफ ठेवले पाहिजे. तो चारित्र्यसंपन्न असला पाहिजे त्यांच्या गुणामुळे जनतेत आदर्श निर्माण झाला पाहिजे. त्यानी निस्वार्थभावनेने आणि निःपक्षपातीपणे कारभार करून जनतेच्या मनात विश्वास संपादन करावा जेणे करून जनता क्रांतीचा मार्ग अंवलंबणार नाही.

**८) भ्रष्टाचाराला आळा**

राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी व राज्यकर्ते याना भ्रष्टाचार लाचलुचपत व वशिलेबाजी यापासून दूर राखले पाहिजे.

**९) परकीय आक्रमणाची भिती**

जनतेचे लक्ष अंतर्गत प्रश्नापासून विचलीत करण्यासाठी व त्यांच्यात राष्ट्रभक्तीची भावना वाढीस लावून राष्ट्रीय एकता निर्माण करण्यासाठी अधून-मधून नागरिंकाना परकीय आक्रमणाच्या धोक्याची जाणीव निर्माण करून द्यावी म्हणजे जनता क्रांतीस प्रवृत्त होणार नाही.

**१०) संभाव्य संकटाची माहिती**

राज्यातील लोकांना राज्यात येणाऱ्या संभाव्य संकटाची माहिती देऊन त्यांची मानसिक तयारी व येणाऱ्या संकटाला मात करण्याची तयारी करावी या विषयी त्यांना मार्गदर्शन राज्यकर्त्याकडून नागरीकांना मिळाले तर ते नागरिक क्रांती करण्यास प्रवृत्त होणार नाहीत.

थोडक्यात ॲरिस्टॉटलने क्रांती का निर्माण होते तिचे कारणे आणि क्रांती टाळण्याचे उपाय सांगितले आहेत. ॲरिस्टॉटलच्या या क्रांतीविषयी विचारावरून त्यांच्या बुद्धिमतेचा आवाका आपणाला लक्षात येतो. ॲरिस्टॉटलने या विषय विचार मांडताना त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणी केली आहे. यांचा अभ्यास मानसशास्त्रीय, आर्थिक, सामाजिक, राजकीय अनुषंगाने उपयुक्त ठरतो. ॲरिस्टॉटलने क्रांतीविषयी कारणे व उपाय सुचवून राज्यव्यवस्था कशा पद्धतीने पुढील वाटचाल करते यासाठी एक मार्गदर्शक विचार त्यानी दिलेली आहेत. जगातील आजपर्यंत जे क्रांत्या झाल्या आहेत त्या क्रांतीचे कारणे ही ॲरिस्टॉटलने सांगितली त्या क्रांतीची कारणे यात आपणाला सापडतात. म्हणून क्रांतीविषयी विचार सांगणारे एकमेव पाश्चात्य विचारवंत ॲरिस्टॉटल यांचे नाव घ्यावे लागते.

**स्वयं:अध्ययन प्रश्न ३**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ॲरिस्टॉटलच्या क्रांतीचा अर्थ सांगा.

२) क्रांतीची सामान्य दोन कारणे सांगा?

३) क्रांतीमुळे राज्यात काय परिस्थिती निर्माण होते?

४) क्रांती टाळण्याचे कोणतेही दोन उपाय सांगा?

५) राजेशाहीमध्ये केंव्हा क्रांती होते?

## २.२.५ ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासंबधी विचार The Politics या ग्रंथाच्या तिसऱ्या भागात विवेचन केले आहे. त्याच्या मते नागरिक म्हणजे राज्यातील सर्व जनता नसून राज्यकारभारात सहभागी असणारे लोक म्हणजेच नागरिक होय. नागरिकांचे मुख्य लक्षण शासन कारभारात भाग घेणे आहे. राज्य नागरीकांचे मिळून बनले असते. ज्याला राज्याच्या राज्यकारभारात भाग घेता येतो तो नागरिक नागरिक होण्यासाठी विशिष्ठ योग्यता असली पाहिजे ती योग्यता नैसर्गिक आहे. राज्याचे शासन चालविणे किंवा दुसऱ्याकडून चालवून घेणे अशी योग्यता असणाऱ्यालाच ॲरिस्टॉटल नागरिक मानतो.

**नागरिकत्वाचा अर्थ**

नागरिक म्हणजे अशी व्यक्ती की जी न्यायशासनात आणि विधीनियमांच्या निर्मितीच्या कार्यात किंवा एका कार्यात भाग घेणारी व्यक्ती नागरिक ठरते.

ॲरिस्टॉटलच्या मते राज्यघटना ही नागरिकत्वाचा पाया आहे. राज्यघटना ही राज्यातील राज्यकारभाराच्या योजना, स्वरूप व पद्धती आणि कार्य स्पष्ट करते. तेंव्हा राज्यातील लोक हे राज्यघटनेच्या नियमाप्रमाणे राज्यकारभारात भाग घेतात तेच खऱ्या अर्थाने नागरिक ठरतात. ॲरिस्टॉटलच्या मते जे राज्याच्या विविध प्रकारानुसार नागरिकत्वाच्या विविध अटी निर्माण कराव्यात नागरिकत्वाच्या विविध अटी पूर्ण करून राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग घेतो त्यालाच नागरिक म्हणावे.

**नागरिकत्वाच्या अटी / पात्रता**

ॲरिस्टॉटलने राज्यांतील व्यक्तीला नागरिकत्व प्राप्त होण्यासाठी काही अटी घालून दिलेल्या आहेत.

१) नागरिक होऊ इच्छीणारी व्यक्ती बुद्धमान, हुशार, शिक्षित असली पाहिजे.

२) संपत्तीनुसार नागरिकत्व द्यावे.

३) सामाजिक संस्थेच्या सभासदांना नागरिकत्व द्यावे.

४) राज्यकारभारात भाग घेण्याची क्षमता असणाऱ्यांना द्यावे.

५) ज्यांच्या अंगी संयम, शौर्य, न्याय, उदारता असणाऱ्यांना द्यावे.

६) भौतिक विवेचनेपासून मुक्त असलेल्यांना नागरिकत्व द्यावे.

**नागरिकत्वाची अपात्रता**

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासाठी जे अटी घालून या अटीच्या निकषेनुसार जशी पात्रता सांगितली आहे. त्याचप्रमाणे काही अटीच्या धर्तीवर राज्यातील व्यक्तींना नागरिकत्व देता येणार नाही या आधारावर त्यानी अपात्रता सांगितली आहे. ती नागरिकत्वाची अपात्रता पुढील प्रमाणे

१) जन्मावरून नागरिकत्व देऊ नये.

२) भूमितत्व या तत्वामुळे नागरिकत्व देऊ नये.

३) परकीयांना नागरिकत्व देऊ नये.

४) गरीब, कामगार यांना नागरिकत्व देऊ नये.

५) स्त्रियांना नागरिकत्व देऊ नये.

६) घरगुती कामे करणाऱ्या मुलांना नागरिकत्व देऊ नये.

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वाच्या पात्रता आणि अपात्रता सांगून जो राज्यकारभारात भाग घेतो त्याला नागरिक म्हणावे असे सांगितले. कायदेनिर्मिती, कायद्याची अंमलबजावणी, न्यायदान, प्रशासन इत्यादी क्षेत्रात व्यक्तीला जेव्हा राज्यकारभारात संधी मिळते आणि ती व्यक्ती मिळालेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडते तिचा समावेश नागरिकत्वात केला जावा. ॲरिस्टॉटलचे गुण हे नगरराज्यांचे होते. त्यामुळे त्यांनी नागरिकत्वाची केलेली व्याख्या संकुचीत आहे त्यांच्यामते नागरिकत्व हा विषेश गुण आहे कारण त्यासाठी विशेष योग्यता लागते. शासनकार्यात सक्रिय भाग घेण्यासाठी बुद्धी आणि नैतिकतेच्या विशिष्ठ पातळीची आवश्यकता लागते. राज्यात राहाणाऱ्या प्रत्येक नागरिकांची पातळी ही वेगळी असते. त्यांच्याजवळ एवढी क्षमता नसते. त्यामुळे बहुसंख्य वर्ग नागरिकत्वाच्या अधिकारापासून वंचित राहातो. ॲरिस्टॉटलच्या मते नागरिकत्व म्हणजे हक्काची मिळणारी हमी नाही तर राज्याची सेवा करण्याचा तो एक प्रकार आहे. राजकीय हक्क उपभोगणाऱ्या समुहाला त्याने नागरिकत्वाच्या कक्षेत घेतले आहे.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या मते ग्रामसभेचा सदस्य म्हणून कायदा निर्मिती प्रक्रियेत सहभाग होणारा आणि राज्याच्या घडामोडीत सक्रिय सहभाग नोंदवणारा व्यक्ती म्हणजे नागरिक होय.

**नागरिकत्वाच्या विचाराचे परिक्षण:**

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वाचा विचार हा आदर्शाच्या दृष्टीकोणातून केला असला तरी त्याच्या विचारावर पुढील प्रमाणे टीका करण्यात येते.

### १) संकुचित विचार

ॲरिस्टॉटलची नागरिकत्वाविषयी जो अर्थ सांगितला तो संकुचित स्वरूपाचा वाटतो. ग्रीक नगर राज्यात योग्य असली तरी ती आधुनिक काळात अयोग्य वाटते. यामुळे नागरिक व प्रजा यामध्ये फरक करणे कठीण जाते.

### २) समतेविरोधी

नागरिकत्वाचा दर्जा ठराविक लोकांना दिला आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांना विषमता पहायला मिळाली. स्त्रियांना, कामगाराना, गुलांमाना नागरिकत्व यापासून वंचीत ठेवले आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष, गरीब, श्रीमंत, कामगार, भांडवलदार अशी विषमता निर्माण झाली आहे.

### ३) चूकीचे निकष

राज्यकारभार करणाऱ्यास पात्र नागरिक ठरविले आहे. परंतु ही पात्रता कशी निश्चित करावी याबाबत अस्पष्टता दिसून येते. तसेच स्त्रिया, गुलाम, गरीब, कामगार हे गुणवान, बुद्धिवान नसतात हा विचारच चूकीचा वाटतो.

### ४) कर्तव्यावर भर

ॲरिस्टॉटलने नागरिकत्व बहाल करताना राज्यातील व्यक्तीच्या हक्कावर भर न देता त्यांच्या कर्तव्यावर भर दिलेला दिसतो. व्यक्तीने राज्यकारभारात भाग घेण्यासाठी त्यांच्या अंगी विशिष्ठ गुण असणे आवश्यक आहे.

### ५) श्रीमंताना नागरिकत्व

ॲरिस्टॉटलने श्रीमंत लोकांना नागरिकत्व देताना तो हुशार, बुद्धीमान, कुशाग्र आहे किंवा नाही याचा विचार केलेला नाही.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वाच्या विचारावर टीका होत असली तरी आदर्श नागरिक म्हणजे आदर्श राज्य हा त्याचा विचार महत्वाचा व प्रभावी वाटतो. ॲरिस्टॉटलने त्या काळातील नगरराज्याच्या परिस्थितीनुसार विचार मांडलेला आहे.

## २.२.६ ॲरिस्टॉटल राज्यशास्त्राचा जनक

पाश्चात्य देशात राजकीय तत्वज्ञानाची सुरूवात झाली. त्यामध्ये प्लेटो, ॲरिस्टॉटल सारख्या महान विचारवंताची भर पडली. ग्रीक राजकीय विचारवंतानी राज्यशास्त्रासाठी फार मोठे योगदान दिले आहे. ॲरिस्टॉटलची प्रज्ञा प्लेटोप्रमाणे विशुद्ध, तार्कीक विचाराची इमारत बांधणारी प्रज्ञा नाही. ती वास्तवादी व शास्त्रीय स्वरूपाची प्रज्ञा आहे व त्यातच ॲरिस्टॉटलचे वेगळेपण दिसून येते. प्लेटोनी राज्यशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून कधीच संबोधले नाही किंवा तसा प्रयत्नही केला नाही. नितीशास्त्राचा भाग म्हणून राज्यशास्त्राचा विचार केला त्याने प्लेटोच्या बाबतीत शास्त्रज्ञांची कसोटी लावता येत नाही. कारण प्लेटोचे विचार कल्पनेवर आणि आदर्शावर आधारित आहेत. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला वेगळे शास्त्र स्वतंत्र शास्त्र म्हणून संबोधले आहे. शास्त्र म्हणजे एखाद्या ज्ञानाच्या शाखेची सुसंबद्ध मांडणी होय. शास्त्रज्ञ नेहमी वास्तववादी दृष्टीकोणातून विचार करतो. शास्त्रज्ञाला आदर्शवादात रस नसतो. त्याला आदर्शवाद महत्वाचा वाटत नाही. ॲरिस्टॉटलच्या तत्वज्ञानात वास्तवेला भर, शास्त्रियतेवर भर दिलेली दिसते. ॲरिस्टॉटल हा शास्त्रज्ञाच्या कसोटीला उतरणारा विचारवंत आहे म्हणून त्याला राज्यशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते. ॲरिस्टॉटलच्या वास्तववादी राजकीय दृष्टीने आणि त्यांच्या सुसंबद्ध विचाराने राज्यशास्त्राची पायाभरणी झाली. राज्यशास्त्राला नितीशास्त्रापासून वेगळे करून स्वंतत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळवून दिली. त्याला राज्यशास्त्राचा जनक मानण्याची महत्वाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

### १) शास्त्रीय दृष्टीकोण

ॲरिस्टॉटलचा राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याचा दृष्टीकोण हा शास्त्रीय स्वरूपाचा होता. ॲरिस्टॉटलची अभ्यास पद्धती निरिक्षण करून माहिती गोळा करण्याची आणि मिळालेल्या

माहित्यांच्या आधारे नविन सिद्धांत प्राप्त करण्याची होती. कोणताही सिद्धांत मांडण्यापूर्वी त्यांनी तत्कालीन राजकीय संस्थाचा सखोल अभ्यास केला. अभ्यासासाठी त्यांनी शास्त्रीय पद्धतीने माहिती गोळा केली. त्याने १५८ देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून शास्त्रीय निष्कर्ष काढले. त्यांनी काढलेले निष्कर्ष प्राप्त माहितीवर आधारित असल्यामुळे तो पहिला शास्त्रीय विचारवंत मानला जातो. शास्त्राचे दोन प्रकारात वर्गीकरण करतो एक सैद्धांतिक शास्त्र तर दुसरे व्यावहारिक शास्त्र यामध्ये राज्यशास्त्राचा समावेश व्यावहारिक शास्त्रात करतो.

**२) वास्तववादी, व्यवहारवादी विचारवंत**

राज्यशास्त्राच्या अभ्यासाला ॲरिस्टॉटलने नविन दिशा दिली त्याचा महत्वाचा गुण म्हणजे समतोल किंवा सुवर्णमध्य साध्य करण्याचा प्रयत्न आणि संतुलित विचार होय. त्यांचा विश्वास होता की मनुष्य केवळ कल्पनेवर किंवा आदर्शावर जीवन जगू शकत नाही त्यांच्या गरजापूर्ण होणे आवश्यक आहे. ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या साम्यवादावर टीका करून कुटूंब संस्थेचे आणि मालमत्तेचे जोरदार समर्थन केले. गुलामगिरीचे समर्थन व्यवहार वादातून केले आहे. वास्तववादी आणि व्यवहारवादी स्वीकारणारा तो पहिला विचारक असल्यामुळे तो राज्यशास्त्राचा जनक आहे.

**३) तुलनात्मक पद्धतीचा स्वीकार**

राजकीय घटनांचा विचार करताना त्याने तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केला. त्याने अनेक देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून तुलनात्मकरित्या कोणती पद्धती आदर्श ठरू शकते याचे स्पष्टीकरण केले. तुलनात्मक पद्धतीचा वापर आजही शास्त्रीय पद्धत म्हणून केला जातो. ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण हे विचार तुलनात्मक अभ्यास पद्धतीनेच मांडले आहेत. तुलनात्मक पद्धतीसाठी त्याने प्रचलित पद्धतीचा आणि आदर्श ठरू पाहणाऱ्या पद्धतीचा अभ्यास करून सिद्धांत प्रतिपादन केला. त्याची अभ्यासपद्धती पूर्णपणे शास्त्रीय होती. त्याने १५८ देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून ॲथेन्सची राज्यघटना हा ग्रंथ लिहिला आहे.

**४) राज्यशास्त्राला स्वतंत्र दर्जा**

ॲरिस्टॉटल पूर्व राज्यशास्त्राचा अभ्यास हा नितीशास्त्रातून केला जात असे. प्लेटोनी पण राज्यशास्त्र हा नितीशास्त्राचा एक भाग मानला होता. ॲरिस्टॉटलने मात्र नितीशास्त्रापासून अलग करून राज्यशास्त्राला पहिल्यांदा शास्त्र म्हणून दर्जा मिळवून दिला. राज्यशास्त्र हे स्वंतत्र शास्त्र आहे म्हणून त्यांचा अभ्यास करण्यात येऊ लागला राज्यशास्त्राचा अभ्यास हा स्वंतत्र शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारा पहिला शास्त्रज्ञ आहे म्हणून त्याला राज्यशास्त्राचा जनक मानतात.

**५) अनुभवजन्य पद्धती**

ॲरिस्टॉटलने १५८ राष्ट्राच्या राज्यघटनांचा अनुभव पद्धतीने अभ्यास केला. अनुभवजन्य पद्धती म्हणजे एखादी गोष्ट कशी असावी हे पाहण्याऐवजी एखादी गोष्ट कशी आहे या पद्धतीने विचार करणे होय. प्लेटोने कसे असावे या पद्धतीने राजकीय विचार प्रतिपादन केले. ॲरिस्टॉटलने कसे आहे या पद्धतीने विचाराचे प्रतिपादन केले. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्य शक्य आहे या अनुषंगाने विचार अनुभवजन्य पद्धतीने केले आहे.

### ६) तत्वज्ञांची सुसंबद्ध मांडणी

ॲरिस्टॉटलने नवीन तत्वज्ञान सांगितले नाही तर प्रचलित तत्वज्ञाला सूत्रबद्ध पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला. काळाच्या अनुभवावर त्याला विश्वास होता इतिहासाला त्यानी अभ्यासाचा विषय बनविला. काळाच्या अनुभवाला दुर्लक्षीत करू नये असे त्याचे मत होते. त्याला संस्कृती, प्रथा, परंपरेबद्दल आदर होता. अशा प्रकारे नवीन आदर्शवादी तत्वज्ञान निर्माण करण्याऐवजी त्याने प्रचलित ज्ञान सुसंघटीत स्वरूपाचा मांडण्याचा प्रयत्न केला. म्हणून तो राज्यशास्त्राचा जनक आहे.

### ७) कायद्याचे सार्वभौमत्व

ॲरिस्टॉटलने कायद्याच्या अधिराज्यांची आणि सार्वभौमत्वाची कल्पना स्पष्ट केली आहे. तो म्हणतो की मनुष्य कितीही बुद्धिमान असला तरी त्यांचे ज्ञान कायद्यापेक्षा श्रेष्ठ असूच शकत नाही. यामध्ये प्लेटो कायद्यापेक्षा मनुष्याच्या बुद्धिवर विश्वास ठेवतो. मनुष्याची बुद्धी भ्रष्ट होईल तिला नियंत्रीत आणण्यासाठी कायद्याची आवश्यकता आहे असे प्लेटोला वाटत नाही. कायद्याची अधिसत्ता असल्यास व्यक्तीची हुकूमशाही प्रस्थापित होऊ शकत नाही. यासाठी ॲरिस्टॉटलने कायद्याचे सार्वभौमत्वाची कल्पना मांडली.

### ८) राजकीय संस्थांना आर्थिक आधार

ॲरिस्टॉटल म्हणतो की, संपत्तीच्या वाटपावर शासनाचा दर्जा आणि प्रकार अवलंबून असतो. याचे स्पष्टीकरण ॲरिस्टॉटल यांनी दिले आहे. राज्यातील लोकांच्या व्यवसायांवर आणि उदयोगधंद्यावर त्यांचा राजकीय कल आणि क्षमता अवलंबून असते. आर्थिक विषमतेतून राज्यात क्रांती होते आजही त्या विचाराची प्रचिती दिसून येते हा विचार ॲरिस्टॉटलचा वास्तववादी स्वरूपाचा वाटतो.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राची मोठी सेवा केली आहे. राजकीय विचारांच्या इतिहासात अग्रस्थानाने ॲरिस्टॉटलचे नाव घेता येते. प्लेटोच्या तत्वज्ञानाला सामान्य माणसाच्या आवाक्यात आणण्याचे महत्वाचे योगदान दिले आहे. वास्तविक राज्यशास्त्राची सुरूवात खऱ्या अर्थाने ॲरिस्टॉटलपासून होते. त्यांचा Politics हा ग्रंथ शासनाच्या शास्त्रावर आधारित आहे. त्यांचे विचार शास्त्रीय, वास्तववादी, अनुभवजन्य, व्यवहारवादी स्वरूपाचे आहेत त्याला विश्लेषणात्मक आधार आहे. वर्तमान काळात देखील त्यांचे राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी मार्गदर्शनाच्या आधारभूत तत्वासारखे आहे. प्लेटोच्या आदर्शवादाला नाजूक वळण देण्याचे कार्य ॲरिस्टॉटल करतो. थोडक्यात ॲरिस्टॉटलचे तत्वज्ञान त्याला राज्यशास्त्राचा जनक ठरवतात.

**स्वयं: अध्ययन प्रश्न ४**

१) ॲरिस्टॉटल हा राज्यशास्त्राचा जनक आहे स्पष्ट करा.

२) ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वाच्या विचाराचे परिक्षण करा.

## २.२.७ ॲरिस्टॉटलचे गुलामगिरी (दासप्रथा) संबंधी विचार

ॲरिस्टॉटलने गुलामगिरीविषयी विवेचन 'Politics' ग्रंथाच्या पाचव्या भागात केले आहे. ॲरिस्टॉटल वास्तववादी विचारवंत असून देखील तो तत्कालीन प्रथेद्वारे प्रभावित झाला होता हे त्यांच्या गुलामगिरीच्या विचारातून स्पष्ट होते. गुलामगिरी ही नगरराज्यांचे महत्वाचे वैशिष्ट्ये होय. प्रत्यक्ष व्यवहारात तर गुलामगिरी होतीच पण वैचारिक क्षेत्रात देखील ग्रीक विचरकांनी गुलामगिरीचे समर्थन केले आहे. अशाच पद्धतीने ॲरिस्टॉटलने देखील कोणत्याच प्रकारचे संकोच न करता गुलामगिरीचे समर्थन करून त्यामध्ये काही सुधारणा करण्याच्या प्रयत्नाने गुलामगिरी विषयी विचार मांडतो आहेत.

गुलामगिरी ही नैसर्गिक असून गुलामाने गुलाम म्हणून जीवन जगणे त्यातच त्यांचे हित आहे. जमिनीची मालकी वरिष्ठ वर्गाकडे असली तरी जमिन करण्याचे काम मात्र गुलामच करत होते. गुलाम ही राष्ट्राची संपत्ती मानली जात असे त्यांच्या श्रमावर सर्व देशांचा चरितार्थ चालत असे गुलाम हा कुटूंबसंस्थेचा अविभाज्य अंग असून गुलाम हे कुटूंबाची संपत्ती आहे हे सांगून ॲरिस्टॉटलने गुलामगिरी सिद्धांताचे दोन तत्व सांगितले आहे.

१) **नैसर्गिक असमानताः** ॲरिस्टॉटलच्या मते प्रत्येक मनुष्यात निसर्गतः वेगवेगळे गुण कमी अधिक असतात. त्यामुळे प्रत्येकाची बुद्धी निसर्गतः वेगवेगळया प्रकारची असते.

२) **जन्मतः अंतर असतेः** ॲरिस्टॉटल म्हणतो की, काही लोक जन्मतःच शासन करण्यास योग्य असतात आणि काही लोक शासित होण्यासाठीच जन्मलेले असतात.

**गुलामगिरीच्या समर्थनांचे आधार**

**१) नैसर्गिक आधार**

मनुष्यामध्ये नैसर्गिक दृष्ट्या असमानता असते काही लोक जन्मतःच बुद्धिमान असतात आणि काही मूर्ख असतात. मनुष्यातील नैसर्गिक असमानताच गुलामगिरीचे मूळ आहे. त्यांच्या मते विषमता हा निसर्गता नियम आहे. श्रेष्ठांचे कनिष्ठावर शासन हा नैसर्गिक नियम आहे. या दोन वर्गातील लोकांत निसर्गाने शारीरिक व मानसिक शक्तीमध्ये भेद केला आहे. बुद्धिमान व्यक्तीने मालक होऊन आज्ञा द्याव्यात तर बुद्धीहिन व्यक्तीनी मालकांने दिलेल्या आज्ञा पाळाव्यात त्यांचा जन्म आज्ञा पालनासाठीच झाला आहे.

**२) गुलामगिरी गुलामांच्या हितांची**

गुलाम हे जन्मतःच बुद्धिहिन असल्याने त्यांनी मालकांच्या मार्गदर्शनाखाली राहाणे योग्य असते. कारण त्याना स्वतंत्र बुद्धी नसल्याने ते आपल्या योग्य दिशेने विकास करत नाहीत आणि त्यांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना रोजगार मिळणार नाही. मालकांचे त्याना संरक्षण हवे असते म्हणून गुलामगिरी ही गुलामांच्या हितांची आहे. याविषयी ॲरिस्टॉटल म्हणतो की, गुलामांने गुलामगिरीतच आपली धन्यता मानावी तरच त्यांचे कल्याण होईल अन्यथा त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. हे टाळण्यासाठी गुलामाने गुलामासारखे राहाणे हे त्यांच्या हितांच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

### ३) गुलामगिरी मालकाच्या / समाजाच्या हितासाठी

गुलामगिरीचा फायदा मालकांना व समाजाना होतो. जो शासक वर्ग संपूर्ण वेळ बौद्धिक कार्यात खर्च करतो त्याचा लाभ समाजाला निश्चित होतो. आपल्या निर्जिव संपत्तीवर श्रम खर्च करून उत्पादन वाढवण्यासाठी मालकांकडे गुलाम असल्याने गुलामांच्या कष्टातून त्याना पैसाही मिळतो व काम नसल्याने त्याना शासन करण्यासाठी वेळही मिळतो मिळालेल्या वेळेत मालकवर्ग चांगल्याप्रकारे समाजाची सेवा करू शकतील समाजांच्या कल्याणांसाठी त्याची आर्थिक आवश्यकता असते.

### ४) स्थैर्य आणि आर्थिक सुधारणेसाठी

ॲरिस्टॉटल व्यवहारवादी विचारक होता त्याने दासप्रथेच्या समर्थनासाठी व्यवहारवादी दृष्टीकोणातून विचार केला आहे. त्यांच्या मते राज्यातील गुलामगिरी नष्ट झाली तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे देशात अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून ॲरिस्टॉटलने गुलामगिरी ही राज्याला स्थैर्य व आर्थिक उन्नती करून देते.

### ५) कुटूंब संस्थेचा मूलभूत घटक

कुटूंब संस्थेच्या अस्थित्वासाठी गुलाम आवश्यक असतात. गुलाम ही कुटूंबाची संपत्ती असते. गुलाम नसेल तर निर्जिव संपत्तीवर श्रम कोणी करावयाचे त्यामुळे उत्पादन होणार नाही. गुलाम आपल्या श्रमातून उत्पादन करतो व त्यावरच कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत असतो.

### गुलामाचे प्रकार

**१) नैसर्गिक गुलाम** : जन्मतःच बुद्धिहिन असलेले व्यक्ती

**२) कायदेशीर गुलाम** : युद्धात जिंकले गेल्यामुळे गुलाम व्हावे लागलेल्या व्यक्ती.

### गुलामगिरीबद्दल ॲरिस्टॉटलने केलेल्या सूचनाः

१) गुलामगिरी प्रथा वंशपरंपरेने चालणार नाही.

२) गुलामांच्या बुद्धिमान मुलांना गुलामगिरीची वागणूक दिली जाणार नाही.

३) मालक वर्गाने गुलामाची पिळवणूक करू नये.

४) मालक वर्गाने गुलांमाचा फायदा करून द्यावा.

५) गुलामांची संस्था मर्यादित असावी.

६) गुलामगिरीकडे एक सामाजिक गरज म्हणून बघितले जावे.

७) गुलामगिरी ही कुटूंबसंस्थेचा आधार आहे.

८) गुलामगिरी ही राष्ट्राची संपत्ती आहे.

९) गुलामगिरी ही नैसर्गिक आहे.

१०) गुलामगिरी ही मालकाच्या व समाजाच्या हिताची आहे.

**गुलामगिरीवरील टीका**

१) गुलामगिरी नैसर्गिक असते हे असत्य.

२) बुद्धिवान व बुद्धिहिन ओळखण्याची कसोटी नाही.

३) प्राकृतिक समानतेकडे दुर्लक्ष.

४) गुलामाशी मैत्रीपूर्ण व्यवहार याविषयी अस्पष्ट मत

५) अधिकार आणि स्वातंत्र्य नाकारणे म्हणजे मानवतेचा अपमान आहे.

६) समाजाचे मालक आणि गुलाम असे विभाजन अयोग्य.

७) गुलामगिरीचे विचार हे निरंकुशतेकडे वाटचाल करणारे आहेत.

८) एकीकडे गुलामगिरीचे समर्थन तर दुसरीकडे पात्रता सिद्ध केल्यास त्यातून त्याची मुक्तता हा विचार परस्पर विरोधी वाटतो.

ॲरिस्टॉटलने गुलामगिरीच्या समर्थनासाठी तर्काचा आधार घेऊन स्पष्टीकरणाचा प्रयत्न केला आहे. पण ॲरिस्टॉटलसारख्या तत्वज्ञाने गुलामगिरीसारख्या अनैसर्गिक, अस्वाभाविक अमानुष पद्धतीचे समर्थन करावे ही खरोखर खेदाची गोष्ट आहे.

**स्वयं:अध्ययन प्रश्न ५**

१) ॲरिस्टॉटलच्या गुलामगिरीविषयी विचार थोडक्यात स्पष्ट करा.

## २.२.८ ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्यासंबधीचे विचार

प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यासंबधी विचार त्यांच्या Politics या ग्रंथाच्या पाचव्या भागात मांडले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते सनदशीर मार्गाने कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य करणे म्हणजे आदर्श राज्य होय. आदर्श राज्यात सार्वभौमत्व कायद्याच्या ठिकाणी असावे, कोणत्याही व्यक्तीच्या ठिकाणी नसावे. प्लेटोनी उप आदर्श राज्याची जी वास्तववादी व व्यवहारवादी कल्पना मांडली त्याप्रमाणेच ॲरिस्टॉटलनेही आदर्श राज्याची कल्पना प्रत्यक्षात व्यवहारात आणण्यासाठी व्यवहारवादी विचार मांडलेले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते राज्याचे मुख्य ध्येय म्हणजे प्रजेचे हित करणे होय. ज्या राज्यात नागरिकांना सर्वश्रेष्ठ सुख मिळते आणि त्यांचे राज्यातील जीवन समाधानी असते. त्या राज्याला आदर्श राज्य समजले जाते. राज्यघटना तत्कालीन परिस्थितीला अनुरूप असावी. ती स्थिर स्वरूपाची आणि सर्व मताचे प्रतिनिधित्व करणारी असावी एकांगी असू नये. अशा घटनेतून निर्माण झालेले राज्य हे आदर्श राज्य असेल.

ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यात आदर्शवाद आणि व्यवहारवादाला समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. आदर्श राज्याची रचना स्पष्ट करण्याऐवजी त्याने आदर्श राज्य स्थापनेसाठी बाह्य आवश्यक गोष्टीचे स्पष्टीकरण केले आहे. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

## १) लोकसंख्या

ॲरिस्टॉटलच्या मते राज्याची लोकसंख्या मर्यादित असावी. ज्यामुळे लोकांना व्यवसाय व इतर उद्योगधंद्यात काम मिळू शकते. राज्याची लोकसंख्या जास्त असेल तर राज्यातील जनतेला उपासमारीची वेळ येऊ शकते. तसेच राज्यात शांतता व सुव्यवस्था राहणार नाही आणि जर लोकसंख्या फारच कमी असेल तर राज्यांचे सार्वभौमत्व धोक्यात येते. राज्याची लोकसंख्या इतकी असावी की, ज्यामुळे राज्यामध्ये सुव्यवस्था राहून लोकांना चांगले जीवन जगता यावे. ॲरिस्टॉटलने राज्यातील लोकसंख्येविषयी वर्णन करताना म्हणतो की, प्रत्येक नागरिकाला राज्यकारभारात भाग घेता येईल येवढी लोकसंख्या असावी.

## २) भूप्रदेश

भूप्रदेश हा सुरक्षित असावा. राज्याची सीमा ही समुद्रकिनाऱ्याला लागून असल्यास फारच चांगले, असे ॲरिस्टॉटल म्हणतो. यामुळे परदेशी व्यापार वाढून राज्य आर्थिकदृष्ट्या संपन्न होईल. अर्थात प्लेटो प्रमाणे ॲरिस्टॉटल हे मान्य करतो की, समुद्रकिनाऱ्याला लागून भूप्रदेश असला तर परकीय आक्रमणाची भीती असते. राज्याचा भूप्रदेश एवढा विस्तृत असू नये ज्यामुळे राज्य करणे व संरक्षण करणे अवघड होईल आणि एवढा कमीही असू नये ज्यामुळे आर्थिक सपन्नता व स्वालंबनात बाधा येईल. राज्यात असलेल्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करता येईल एवढा मर्यादित भूप्रदेश असावा. राज्याभोवती संरक्षणाच्या दृष्टीने तट बांधावा. भूमी ही उत्तम प्रकारची असावी की ज्यामुळे व्यापार आणि शेती दोन्हीचाही विकास होईल.

## ३) संविधान

आदर्श राज्यासाठी संमिश्र संविधान ही सर्वश्रेष्ठ असते असे तो म्हणतो. राजेशाही व महाजनशाही यामध्ये गुणांचे एकत्रीकरण झालेली राज्यघटना त्यास हवी आहे. त्या संमिश्र राज्यघटनेस तो Polity असे म्हणतो. मर्यादित लोकशाही हा ॲरिस्टॉटलने आदर्श शासन प्रकार असल्याचे सांगितले. या शासन पद्धतीत राज्याची सार्वभौम सत्ता मध्यम वर्गाच्या हाती असल्याने तेथे हुकूमशाही किंवा अराजकता निर्माण होणार नाही. म्हणून आदर्श राज्यासाठी संमिश्र संविधान आवश्यक आहे.

## ४) सामाजिक व्यवस्था

आदर्श नगरराज्यात शेतकरी, व्यापारी, सैनिक, तंत्रज्ञ, शिल्पकार, धर्मगुरू आणि प्रशासन असे हा प्रकारचे वर्ग असावेत अन्नधान्य निर्मिती, व्यापार, संरक्षण, कलाकौशल्य, धार्मिक विधी इत्यादी कार्ये या विविध वर्गामार्फत केली जावीत नगरराज्यातील शेतकरी, शिल्पकार इत्यादिना नागरिकत्वाचा दर्जा देऊ नये असे मत ॲरिस्टॉटल मांडतो. ॲरिस्टॉटलचे हे वर्गीकरण जातीवर किंवा वंशावर आधारित नाही. अत्यंत खालच्या वर्गातील मनुष्य सुद्धा उच्च वर्गात जाऊ शकतो.

## ५) शिक्षण

आदर्श राज्यात शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. लोकांचे चारित्र्य घडविण्याचे ते एक प्रभावी माध्यम आहे. यासाठी राज्याने शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे शिक्षणाचा मूळ उद्देश व्यक्तींच्या नैतिक शैक्षणिक गुणांची वाढ करण्याचा आहे. शिक्षणामुळे नागरिकांत जाणिवा निर्माण

होतात. आपली कार्ये पार पाडण्यासाठी क्षमता त्यामुळे निर्माण होते. संपूर्ण राज्यात समान आणि सक्तीच्या शिक्षणपद्धतीची आवश्यकता आहे. शिक्षणाची सार्वत्रिकता राज्याच्या नियंत्रणाशिवाय शक्य नाही. राज्य हा एक समुदाय एकसंध बनविण्यासाठी शिक्षणाची गरज असते. तेव्हा राज्यातील नागरिक व राज्यकर्ते यांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये राजकीय जागृती जाणीव निर्माण करून दिली पाहिजे.

**६) जनतेचे चारित्र्य**

चारित्र्य आणि योग्यतेच्या दृष्टीने राज्यातील सर्व ग्रीक नागरिक गुणांनी युक्त असावेत तो बुद्धिमत्ता आणि चैतन्य किंवा शौर्य या गुणावर अधिक भर देतो. राज्यातील नागरिक चारित्र्यसंपन्न असल्याशिवाय राज्य आदर्श होणार नाही. वरील गुणांमुळेच राजकीय विकास पूर्ण करणे शक्य होईल.

**७) संपती**

ॲरिस्टॉटलने व्यक्तीगत संपत्तीला मान्यता दिली आहे. फक्त संपत्तीच्या अधिकाधीक संचयाला त्यांचा विरोध होता. संपत्तीच्या न्यायोचित वितरणाला त्यांची संमती होती. तो म्हणतो संपत्तीमुळे व्यक्तीच्या आवश्यक गरजा पूर्ण होतात. संपत्तीशिवाय व्यक्तीला सुखाने जीवन जगता येत नाही. त्यामुळे व्यक्तीगत संपत्तीचे त्याने समर्थन केले आहे.

**८) विवाह, कुटूंब**

ॲरिस्टॉटलने विवाहपद्धती व कुटूंबसंस्था यांची गरज व महत्व विशद केली आहे. प्रजनन आणि संगोपन यातून भावी काळातील आदर्श नागरिक निर्माण होतील. विवाह, कुटूंबसंस्था या विषयी नागरिकांना मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. कुटूंबाला राज्याची छोटी प्रतिकृती ॲरिस्टॉटल समजतो. अनेक कुटूंबातूनच राज्य निर्माण होतो. तेव्हा विवाहसंस्था व कुटूंबसंस्था समाजाला आवश्यक व पोषक आहे असे वर्णन करतो.

प्लेटोने रिपब्लिक ग्रंथात आदर्श राज्याची रचना सांगितली आहे. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्य प्रत्यक्षात कसे येऊ शकेल यांचा व्यावहारिक विचार मांडला. यासाठी त्याला प्लेटोच्या 'लॉज' ग्रंथाचा फायदा झाला. त्यांच्या प्रभाव ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याच्या विचारातून दिसून येतो.

**स्वय:अध्ययन प्रश्न क्र. ६**

१) ॲरिस्टॉटलने सांगितलेल्या आदर्श राज्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## २.३ पारिभाषिक शब्द – शब्दार्थ:

अथेन्स – ग्रीक नगरराज्याचे नाव

ग्राम – गाव, खेडे

परिवर्तन – मौलिक स्वरूपातील बदल

जनक – पिता, निर्माता, प्रणेता

अशुद्ध प्रकार – विकृत प्रकार

महाजनसत्ता - समाजातील थोडक्यात पण गुणी व धनवान लोकांची सत्ता

क्रांती - परिवर्तन, बदल

अंशतः - काही प्रमाणात

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

१) दि पॉलिटिक्स  २) आठ  ३) प्लेटो  ४) १५८  ५) तीन

**स्वयंः अध्ययन प्रश्न क्र. २**

१) गुण, संख्या  २) शुद्ध  ३) दि पॉलिटिक्स

४) ॲरिस्टॉटल  ५) महाजनशाही

**स्वयंः अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) राज्यघटनेत किंवा सत्ताधारी व्यक्तीत बदल म्हणजे क्रांती होय.

२) १) आर्थिक विषमता २) समानतेची आंकाक्षा

३) राज्यात अस्थैर्य निर्माण होते.

४) १) कायदा व न्याय बाबत आदर २) शिक्षण

५) राजघराण्यातील कौटूंबिक भांडणे, परस्परात सत्तेसाठी स्पर्धा

**स्वयंःअध्ययन प्रश्न क्र. ४**

१) १) शास्त्रीय दृष्टीकोण  २) वास्तववादी, व्यवहारवादी विचारवंत
   ३) तुलनात्मक पद्धतीचा स्वीकार  ४) राज्यशास्त्राला स्वतंत्र दर्जा
   ५) अनुभवजन्य पद्धती  ६) तत्वज्ञानाची सुसंबद्ध मांडणी
   ७) कायद्याचे सार्वभौमत्व  ८) राजकीय संस्थाना आर्थिक आधार

२) १) नागरिकत्वाचा अर्थ  २) नागरिकत्वाची पात्रता
   ३) नागरिकत्वाची अपात्रता  ४) गुण-दोष

**स्वयंः अध्ययन प्रश्न क्र. ५**

१) १) गुलामगिरी सिद्धांताचे तत्व  २) गुलामगिरी समर्थनाचे आधार
   ३) गुलामाचे प्रकार  ४) गुलामगिरीबद्दल सूचना
   ५) गुलामगिरीवरील टीका

**स्वयं : अध्ययन प्रश्न क्र. ६**

१) १) लोकसंख्या २) भूप्रदेश ३) संविधान ४) सामाजिक व्यवस्था

५) शिक्षण ६) जनतेचे चारित्र्य ७) विवाह, कुटूंब संस्था

## २.५ सारांश

ॲरिस्टॉटल या दुसऱ्या घटकात आपण ॲरिस्टॉटलचे राजकीय तत्वज्ञान समजून घेतले. त्याचा सारांश रूपाने सांगता येईल.

१) ॲरिस्टॉटलचे राज्यासबंधी विचार

२) क्रांतीसंबधी विचार

३) नागरिकत्वासंबधी विचार

४) ॲरिस्टॉटल राज्यशासनाचा जनक

५) गुलामगिरी (दासप्रथा) विषयी विचार

६) आदर्श राज्यासबंधी विचार

वरील प्रमाणे ॲरिस्टॉटलचे राजकीय विचार यांचा अभ्यास करण्यात आले आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

१) ॲरिस्टॉटलचे राज्यविषयक विचार स्पष्ट करा.

२) ॲरिस्टॉटलचे क्रांतीसंबंधी कारणे व उपाय योजना स्पष्ट करा.

३) ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार

४) ॲरिस्टॉटल हा राज्यशास्त्राचा पिता आहे स्पष्ट करा

५) ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे समर्थन करण्यामागी कारणे स्पष्ट करा.

**टीपा लिहा.**

१) ॲरिस्टॉटलचे आदर्शराज्याची वैशिष्ट्ये

२) ॲरिस्टॉटलचा परिवर्तनाचे फिरते चक्र

३) नागरिकत्वाची पात्रता

४) गुलामगिरी विषयी सूचना

५) क्रांतीची सामान्य कारणे.

❑❑❑